# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ
(पुर्वीचे पुणे विद्यापीठ)

## परिपत्रक क्र. १३९/२०२५

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये प्राचार्य/संचालक यांना शैक्षणिक विभाग (संलग्नता) यांचे पत्र क्र. सीए/१३७२, दि. २३/०८/२०२२ अन्वये विद्यापीठाच्या संकेतस्थळावर तसेच महाविद्यालयाच्या प्रोफाईलमध्ये नाव, पदनाम, ई–मेल आयडी, दूरध्वनी क्रमांक, मोबाईल क्रमांक, प्राचार्य/संचालक यांचा दूरध्वनी/मोबाईल क्रमांक इत्यादी माहिती अद्ययावत केलेली नसल्याने संपर्क होत नसल्याचे निदर्शनास आणून दिले आहे. तसेच संपूर्ण माहिती अचूक व अद्ययावत करणेबाबत वारंवार कळविण्यात आलेले आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्थामध्ये विहित पध्दतीचा अवलंब करून अथवा निवड समितीद्वारे नेमणूक करण्यात आलेल्या प्राचार्य/संचालक/अध्यापकांना विद्यापीठाची मान्यता मिळाल्यानंतर संबंधित महाविद्यालय/परिसंस्थांनी विद्यापीठ संकेतस्थळावरील त्यांच्या प्रोफाईलमध्ये मान्यतेची माहिती अचूक भरणे व अद्ययावत करणे आवश्यक आहे. तथापि, काही महाविद्यालय/परिसंस्थांनी प्रोफाईलमध्ये अद्यापही माहिती अद्ययावत केलेली नसल्याचे निदर्शनास आले आहे. एवढेच नव्हेतर काही महाविद्यालय/परिसंस्थांनी त्यांच्या प्रोफाईलमध्ये विद्यापीठ मान्यता कालावधी संपलेल्या, संबंधित महाविद्यालयातून बदली झालेल्या, सेवानिवृत्त असलेल्या किंवा कार्यरत नसलेल्या अध्यापकांची नावेही दिसून येत आहेत.

विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालय/परिसंस्थेतील प्राचार्य/संचालक/अध्यापकांची प्रोफाईल मधील माहिती तसेच त्याच्या विषयासंदर्भातील माहिती महाराष्ट्र शासनाच्या विविध मागणीनुसार सादर करावी लागते. तसेच महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील प्राचार्य/संचालक/अध्यापकांच्या प्रोफाईल मधील माहिती अद्ययावत करण्याबाबत यापूर्वीच या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ४६३/२०२२, दि. ०५ डिसेंबर, २०२२ व परिपत्रक क्र. २१८/२०२४, दि. ०९ सप्टेंबर, २०२४ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे.

सबब, या परिपत्रकाद्वारे विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालय/मान्यताप्राप्त परिसंस्थेतील प्राचार्य/संचालक यांना पुन:श्च एकदा कळविण्यात येते की, विद्यापीठाकडून ज्या अध्यापकांना शिक्षक मान्यता देण्यात आलेल्या आहेत अशाच मान्यताप्राप्त प्राचार्य/संचालक/अध्यापकांची माहिती विद्यापीठाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रत्येकवर्षी शैक्षणिक सत्रापूर्वी अद्ययावत करण्यात यावी. त्याचप्रमाणे माहिती अद्ययावत न केल्यास शासन पातळीवरील उत्तरदायित्वासाठी ते स्वत: जबाबदार राहतील, याची नोंद घ्यावी.

तसेच जे प्राचार्य/संचालक/अध्यापक नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले असतील किंवा ज्या प्राचार्य/संचालक/अध्यापकांच्या महाविद्यालयातील/मान्यताप्राप्त परिसंस्थेमध्ये बदल झालेला असेल तसेच अशा विविध कारणाने सदर माहितीमध्ये बदल झाला असेल तर ती माहिती तात्काळ अद्ययावत करणे बंधनकारक आहे, याची कृपया नोंद घ्यावी.

सर्व संबंधित महाविद्यालय/परिसंस्थांचे प्राचार्य/संचालक यांना कळविण्यात येते की, वरील परिपत्रकातील आशय सर्व संबंधितांच्या निदर्शनास आणून द्यावा.

18/6/2025

(स. द. डाबखर)
उपकुलसचिव

जावक क्र. सीसीओ/२१२२
दिनांक – १८ जून, २०२५

प्रत :– मा. प्राचार्य/संचालक
सर्व संलग्नित महाविद्यालये/मान्यताप्राप्त परिसंस्था